**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 6 No. 40** **September - October - 2025**

# बिरसा मुंडा आदिवासी चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. डॉ. यादव घोडके**
*समाजशास्त्र विभाग प्रमुख*
*सौ.के.एस.के. महाविद्यालय, बीड.*
*Corresponding Author – प्रा. डॉ. यादव घोडके*
**DOI - 10.5281/zenodo.17656968**

**प्रस्तावना :**

बिरसा मुंडा हे भारतीय आदिवासी समाजाचे फार मोठे विचारवंत होते. त्याचे सामाजिक कार्य आदिवासी समाजाच्या दृष्टीकोनातून महत्वाचे होते. त्याच्या कार्याला उजाळा मिळावा म्हणून बिरसा मुंडा आदिवासी चळवळ आदिवासी समाजात सुरू करण्यात आले. आदिवासी चळवळ हा विषय समाजशास्त्राचे दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा अभ्यास विषय मानला जातो. समाजशास्त्राच्या अभ्यासासाठी जे अनेक विषय रूढ आहेत. त्यापैकी हा विषय महत्वपूर्ण मानला जातो. मनात वळवळ झाल्या शिवाय समाजात चळवळ उभी राहू शकत नाही. हे त्रीकालबाधीत सत्य नाकारता येत नाही. म्हणूनच याविषयाचे महत्त्व परंपरागत काळापासून ते सद्य स्थितीपर्यंत टिकून आहे.

**व्याख्या :**

भारतात अनेक आदिवासी समाज वास्तव्य करतात. मध्यप्रदेश, ओरीसा, बिहार, गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र आणि पश्चिम बंगाल या राज्यात इतर राज्याच्या तुलनेत आदिवासींची संख्या जास्त आहे. केंद्रशासित प्रदेशात सर्वात जास्त आदिवासी राहतात असे दिसून येते. बोगार्डसच्या मते, “आदिवासी समाज रक्षणाची गरज, रक्त संबंधीची बंधने व एका सामान्य धर्माच्या शक्तीवरील विश्वासावर बंधने व एका सामान्य धर्माच्या शक्तीवरील विश्वासावर आधारित होता.” गिलीन व गिलीनच्या मते, “एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा, पण अक्षराची ओळख नसलेला स्थानीय समुहाचा समुच्चय म्हणजे आदिवासी असे म्हटले आहे.” आदिवासी हे कष्टाळू आणि मेहनती असून अतिशय हालाखीचे जीवन जगतात. पण ते या देशाचे मालक असून मुळचे रहिवासी आहेत. हा चिंतनाचा विषय आहे.

**स्वरूप :**

उपरोक्त उल्लेख केल्याप्रमाणे आदिवासी समाज भारतीय सुधारीत समाजापासून सांस्कृतिक व प्रादेशिकदृष्ट्या खूप दुर आहे. हा समाज सज्ञान, अंधश्रद्धा, निरक्षरता, बेकारी, दारिद्र्य, अस्वच्छ राहणीमान, कर्जबाजारीपणा आणि शोषण यात अडकुन पडलेला आहे. जंगलचा राजा बनविण्यासाठी आपल्याला देवाने धरतीवर पाठवले आहे. अशा प्रकारची एक धारणा त्यांची होती. तो काही काळ

जंगलाचा राजा होता. पण पुढील त्यांच्या जीवनात अनेक संकटे काळानुरूप येत गेली.

हा समाज निरक्षर असल्याने त्यांच्यावर अनेक लोकांनी आपल्या स्वार्थासाठी अत्याचार व अन्याय केले आहेत. खऱ्या अर्थाने त्यांच्या शोषणास इंग्रजी शासन व्यवस्थेपासून सुरूवात झाली आहे. इंग्रजांची धोरणे, फायदे, जमिनदार, सावकार आणि ठेकेदाराच्या त्यांच्या विरोध करण्याच्या प्रयत्नातुनच आदिवासीच्या चळवळी उदयास आलेल्या दिसून येतात. स्वातंर्त्यपूर्वी आदिवासीनी शोषणाच्या विरोधी चळवळी केल्या आहेत. स्वातंत्र्यानंतर त्यांनी आपल्या हक्कासाठी शासनाच्या विरोधी अनेक चळवळी केलेल्या दिसून येतात. थोडक्यात, आदिवासीच्या चळवळी अस्तित्व टिकविण्यासाठीच झालेल्या आहेत असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

**उद्दिष्ट्ये :**

आदिवासी चळवळीची काही महत्वपूर्ण उद्दिष्ट्ये आहेत. त्याच्या पुढील प्रमाणे विचार करण्यात येईल.

1. बहुतेक आदिवासीच्या चळवळी शास्त्रास्त्राने लढल्या गेल्या आहेत.
2. आदिवासींनी अन्याय, अत्याचार, जुलूम, शोषण आणि कर्ज या विरोधात चळवळी केल्या आहेत.
3. वेठबिगारी पद्धत नष्ट करणे, शेतमजुरी वाढवून देणे आणि कर्जातुन मुक्ती मिळविणे ही या चळवळीची
4. मुख्य ध्येय होती.
5. जंगलाचे हक्क मिळविणे, जमिनीवर होणारे आक्रमण थांबविणे आणि महसुल कमी करणे यासाठी ही चळवळी झाल्या आहेत.
6. जगण्याचा हक्क मिळविणे हा या चळवळीचा मुख्य हेतु होता.

ॲथोपोलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडिया ने इ.स. 1976 साली केलेल्या अभ्यासानुसार भारतात अनेक आदिवासी चळवळी झाल्या आहेत. त्यापैकी या संशोधन निबंधामध्ये आपणास फक्त बिरसा मुंडाच्या चळवळीचा अभ्यास करावयाचा आहे.

**बिरसा मुंडा आदिवासी चळवळ :**

बिरसा मुंडाची चळवळ ही बिरसा मुंडा या नेत्याच्या नावाने ओळखली जाते. बिरसा निर्धन कुटुंबातील एक महत्वपूर्ण व्यक्तिमत्व होते. त्याच्या पित्याचे नव मसीहदास आणि बिरसाचे नाव दाऊद मुंडा असे होते. इ.स. 1886 मध्ये त्यांना चाईबरसा येथे इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी ठेवण्यात आले होते. या काळात ख्रिश्चन मिशनरी आदिवासींना वेगवेगळी प्रलोभने देवून धर्मांतर करण्यास प्रवृत्त करत असत. त्यांनी आदिवासींना आपलेसे करण्यासाठी जमीन वापस करण्यासाठी फार मोठी एक चळवळ उभी केली होती. जी जमीनदाराच्या हातात होती. यामुळे ख्रिश्चन मिशनरी व मुंडा सरदार यांच्यातील संबंध बिघडत होते. बिरसा मुंडानी या घटनेवर टिका केली होती. यामुळे बिरसाला शाळेतून काढून टाकण्यात आले होते. या घटनेमुळे बिरसाच्या विचारात मोठे परिवर्तन झाले होते. यातूनच बिरसाला इंग्रजाच्या विरूद्ध चळवळ करण्याची प्रेरणा मिळाली होती. इ.स. 1890 मध्ये बिरसाने ख्रिश्चन धर्माचा त्याग केला होता. वैष्णव धर्माच्या विचाराला स्विकारण्यास सुरूवात केली आहे. त्यांनी गोहत्येस विरोध केला होता. धर्मउपदेश करू लागला होता. बिरसाच्या उपदेशामुळे मुंडा सरदार ख्रिश्चन धर्माला विरोध करू लागला. त्यांनी समाजात चोरी, भिक मागणे व हत्या करण्यास मनाई केली.

बिरसा कोणतीही किंमत चुकवून ब्रिटिश शासनाला पराभूत करावयाचे असे तो मानत होता. बिरसाची चळवळ शोषणा विरूद्ध आपले रक्षण करण्यासाठी आहे. असे अनेक लोकांना वाटत होते. म्हणून अनेक लोक बिरसाच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहिले. ही चळवळ इ.स. 1890 ते इ.स. 1907 पर्यंत चालली. याकाळात इंग्रज अधिकारी मुंडावर मोठया प्रमाणावर अत्याचार करत होते. जमीनदार ठाकूर मुंडा स्त्रियांची अब्रु लूटत होते. मालगुजारी वसूल करणारे अधिकारी मुंडाच्या घरात प्रवेष करून किंमती वस्तु आणि भांडी घेऊन जात असत. अशा शोषणातुन मुक्त होण्यासाठी बिरसाने ही फार मोठी चळवळ उभी केली. या चळवळीचा विस्तार आणि विकास झपाट्याने केला. या चळवळीचा पाया जेव्हा रचला गेला. तेव्हा इ.स. 1895 मध्ये बिरसा मुंडाने एका स्त्रीची अब्रु लुटल्याबद्दल पोलिसांची कुऱ्हाडीने हत्या केली. बिरसाला या कृत्याबद्दल दोन वर्षाची शिक्षाही झाली होती. परंतु याच काळात मुंडा आदिवासीनी जमिनदार व इंग्रज यांच्या विरोधी चळवळ सुरू ठेवली होती. दोन वर्षाच्या शिक्षेनंतर मुंडा परत आले. तेव्हा इ.स. 1897 मध्ये त्यांनी ''बिरसा सेवा दलाची'स्थापना करून ब्रिटिशाच्या विरोधात संघटीत चळवळ उभी केली होती. त्यांना जवळजवळ पाच-सहा अनुयायी मिळाले. त्यांनी सशस्त्र आंदोलने केली. त्यांनी बाणाचा वापर मोठया प्रमाणावर केला होता. त्यांच्या अनुयायांनी अनेक पोलिस अधिकारी मारले होते. इ.स. 1899 मध्ये बिरसाच्या नेतृत्वाखाली रांची क्षेत्रातल्या पोलीस स्टेशनवर आक्रमण केले गेले. मुंडा आदिवासीवर इंग्रजांची अनेक अत्याचार केले होते. एवढेच नाही तर अनेक मुंडा आदिवासींच्या मुलांची आणि स्त्रीयांची त्यांनी हत्या केली होती. मुंडा आदिवसींनी गोरिला युद्धाचा आधर घेवून आपला विरोध कायम ठेवला होता. शेवटी 09 जुन 1900 मध्ये हजारीबागच्या जेलमध्ये बिरसा मुंडाचा मृत्यु झाला. ही चळवळ कमकुवत झाली ''बिरसा सेवा दलाचा'' नेता नरसिंह मुंडा यांनी ही चळवळ पुढे रेटण्याचा प्रयत्न केला पण त्याचाही इ.स. 1907 मध्ये मृत्यु झाला. त्यानंतर रही चळवळ पूर्णपणे शांत झाली.

**चळवळीचे महत्व:**

इ.स. 1899 हे वर्ष चळवळीत फार महत्वाचे आहे. कारण सिंहभूमी कोटा गोरा स्थानावर 60 मुख्य गुरूंची सभा घेतली गेली ज्यात निर्णय घेण्यात आला.

1) **हिंसेच्या मार्गाचा अवलंब करणे:** हिंसेच्या माध्यमातून जमीनदार, राजा आणि सरकारमधील लोकांची हत्या करायची असे बैठकीत ठरविण्यात आले. यामुळे ते आपल्याला बिरसा राज्य वेगळे देतील अशा प्रकारची लोकांची अपेक्षा होती.

2) **मुंडा आदिवासीच जमिनीचे खरे मालक:** बिरसा मुंडाचे असे मत होते की, मुंडा आदिवासीच जमीनीचे खरे मालक आहेत. जमिनदाराची आमच्या जमीनी आम्हाला फसवून गोळा केल्या आहेत. त्यामुळे त्यांना या जमिनीवरून बेदखल करण्यात आले पाहिजे. त्यांनी ख्रिश्चन मिशनरी व इंग्रज सरकार यांना आपल्या क्षेत्रातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला.

3) **स्वतंत्र राज्याची स्थापना:** बिरसाच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र राज्याची स्थापना झाली पाहिजे. अशा प्रकारची मुंडा आदिवासीची मनोमन इच्छा होती. बिरसा मुंडा जरी शांतीपूर्वक चळवळ चालविण्याच्या प्रयत्नात असले तरी, त्यांच्या अनुयायांचा विचार तशा प्रकारचा नव्हता.

4) **सशस्त्र चळवळ:** जमीनदार, प्रकाशक आणि कर्मचाऱ्यांच्या हत्या केल्या शिवाय आपल्याला आपल्या जमिनी परत मिळणार नाहीत. शोषणातून

आपण मुक्त होणार नाहीत म्हणूनच त्यांनी सशस्त्र चळवळ सुरू केली.

**चळवळीचे परिणाम:**

बिरसा मुंडाच्या चळवळीमुळे अनेक परिणाम समाजावर झालेले दिसून येतात. त्याचे सविस्तर स्पश्टीकरण पुढील प्रमाणे -

1) **शेती समस्या सोडविण्याचा प्रयत्न:** बिरसा मुंडाच्या चळवळीचा सामाजिक परिणाम म्हणून मुंडा आदिवासींना जमीनदाराच्या पाशातून सोडविणे शक्य झाले आहे. शेती संबंधीत समस्या सोडविण्याचा यशस्वी प्रयत्न सुरू झाला आहे. या शेतकऱ्यांना चळवळीमुळे एक नविन दिशा मिळाली आहे.

2) **इ.स. 1908 चा कायदा:** इ.स. 1908 च्या कायद्यानूसार आदिवासी जमीन गैर आदिवासींना घेण्यास बंदी घालण्यात आली आहे. या कायद्यामुळे सर्वच आदिवासी शेतकऱ्यांना फार मोठा दिलासा मिळाला आहे. यामुळे आदिवासी शेतकरी निश्चित झाला आहे.

3) **पोलीस स्टेशनची स्थापना:** इ.स. 1902 मध्ये गुमला आणि इ.स. 1980 मध्ये खुंटी या ठिकाणी पोलीस स्टेशन स्थापन केले गेले. त्यामुळे आदिवासींना रांची जाण्याची गरज पडत नाही. पोलीस स्टेशनचे प्रश्न यामुळे सुटु शकला. आदिवासी शेतकरी लोकांचे प्रश्न सोडण्याचे काम जवळच सुरू झाले हा एक या चळवळीचा चांगला सामाजिक परिणाम आहे. असे आपणास म्हणता येईल.

4) **धर्म व समाजसुधारक चळवळीचा उदय:** बिरसा मुंडा आंदोलनाच्या सामाजिक परिणामातून समाज सुधारणा चळवळी उभ्या राहिल्या. समाजव्यवस्थेत अनेक बदल घडुन आले. धर्मासंबंधी अनेक चळवळी उदयास आल्या होत्या. चळवळीमुळे धर्माच्या तत्वज्ञानात आणि आचरण पद्धतीत खूपच बदल झाले. या चळवळीमुळे अनेक लोक धर्माच्या नावाखाली एकत्र येऊन हाती घेतलेले कार्य व्यवस्थीतरित्या पूर्ण करता आले.

5) **चळवळीला विरोध:** जादू-टोना करणारे लोक या चळवळीला विरोध करत होते. भूत-बाधा करणाऱ्या लोकांचा बिरसा मुंडा या चळवळीला मोठया प्रमाणावर विरोध केला. प्रेत आणि बलिदान करणाऱ्या लोकांचा या चळवळीला विरोध होता. या सर्वांनी चळवळ बंद पाडण्याचा प्रयत्न केला. प्रेम आणि बलिदान करणाऱ्या लोकांचा या चळवळीला विरोध होतो. या सर्वांनी चळवळ बंद पाडण्याचा प्रयत्न केला. या चळवळीमध्ये समाजात परिवर्तन झाले तर आपला व्यवसाय बंद पडेल अशी भिती या लोकांना वाटत होती.

6) **अन्य चळवळीचा उदय:** बिरसा मुंडा चळवळीचा एक सामाजिक परिणाम म्हणून ताना भगत व अन्य चळवळी सरकारच्या विरोधात उदयास आल्या होत्या. अनेक सामाजिक चळवळीचा परिणाम म्हणून समाजातील शेतकरी जीवनात परिवर्तन झाले आहे. या चळवळीमुळे आदिवासी शेतकऱ्यांना एक नवी दिशा मिळालेली आहे असे आपणास अभ्यासांती दिसून येते.

**निष्कर्श:**

या चळवळीचा निष्कर्ष काढताना असे स्पष्ट करता येईल. ते पुढील प्रमाणे आहेत.

1) बिरसा मुंडा प्रथम धार्मिक व्यक्तीच्या रूपात उदयास आला. त्याने धर्माला एका हत्याराच्या रूपात उपयोगात आनले. त्याचा वापर इंग्रज जमीनदाराच्या विरोधात केला. मुंडा आदिवासींना प्रवचने देवून त्यांना एकत्र केले. इंग्रजाच्या शोषणा विरूद्ध जागृत करून सशस्त्र चळवळ घडवून आनली.

2) ही चळवळ एक अतिषय महत्वपूर्ण दस्ताऐवज आहे. हे लोकसाहित्य, अभिलेख व मानवषास्त्रीय सामग्रीला संयुक्तीक ठरते. ही चळवळ समाजिक, धार्मिक व राजकीय दिशेला धरून होती. त्यामुळे या तिन्ही परिस्थितीवरच प्रभव टाकते.

3) मुंडा धर्म आणि समाजचे पूनसंघटन आणि मुंडा राज व स्वातंत्र्याची स्थापना यादोन्ही उद्देशाने पुढील चळवळी उदयास आल्या आहेत. समकालीन चळवळी मध्ये या चळवळीचे तत्व समाविष्ट होत गेले.

4) एवढया महान नेत्याचा प्रचार व प्रसार झालेला दिसत नाही. लोकशाही राज्यात मागितल्या शिवाय काहीच मिळत नाही. ही जाणीव झाल्यानंतर मुंडा आदिवासाींनी बिरसा मुंडाच्या संदर्भात जेव्हा आवाज उठवला तेव्हा सरकारने त्यांच्या नावावर एक पोष्टाचे तिकीट काढले.

5) 16 ऑक्टोबर 1989 मध्ये संसदेत त्याच्या पुतळ्याचे अनावरण केले. तरी पण हा नेता भारतीय समाजासाठी अनभिज्ञ आहे. यासाठी त्यांच्या कार्याचा सखोल अभ्यास करून त्यांच्या धार्मिक विचारांचा प्रसार प्रसार झाला पाहिजे.

**सारांश:**

आदिवासी, समाजातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची मदत वेळेवर मिळत नाही. पॅकेजच्या माध्यमातून मिळणारी शासकीय मदत मिळण्यास बरीच दिरंगाई झालेली दिसून येते. कृषी विषयक धोरण आणि आदिवासी शेतकरी विकासाचा संपूर्ण अनुशेष भरून कृशी आवस्थेत निर्माण झालेल्या समस्या शासकीय पातळीवरून दूर करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची आज एक महत्वपूर्ण गरज आहे.

**संदर्भग्रंथ सुची:**

1) घनशाम शहा, अनुवदक प्राची चिकटे, भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
2) शरणकुमार लिंबाळे, दलित चळवळ, प्रसार प्रकाशन, कोल्हापुर.
3) अनिवाश डोळस, शरणकुमार लिंबाळे व इतर, सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळी, ग्रंथ निर्मिती केंद्र, य.च.म.मु.वि. नाशिक.
4) प्रा.व्ही.के. जाधव, आधुनिक भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपुर.
5) प्रा.व्ही.के. जाधव, कित्ता.
6) प्रा.डॉ. श्रीकांत गायकवाड, भारतातील समाजिक चळवळी, अरूणा प्रकाशन, लातुर.
7) प्रा.डॉ. श्रीकांत गायकवाड, कित्ता.